**बृहन्मुंबई महानगरपालिका**

जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत प्रमुख रुग्णालये, विशेष रुग्णालये, उपनगरीय रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रसूतिगृहे यांच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात नमूद केलेली **"परिचारीका (Staff Nurse)"** या संवर्गातील पदे भरण्यासाठी विहित अर्हता धारण करणाऱ्या व अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून दि.08/03/2023 ते दि.21/03/2023 या कालावधीत जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | अर्ज स्विकारण्याचे ठिकाण | **वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय, कस्तुरबा रुग्णालय (संसर्गजन्य रोगांसाठी), वॉर्ड नं.07, (प्रशिक्षण/लेक्चर हॉल), मध्यवर्ती कारागृहासमोर, साने गुरुजी मार्ग, (ऑर्थर रोड), चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-400 011.** |
| 2 | अर्ज स्विकारण्याचा कालावधी | **दि.08/03/2023 ते दि.21/03/2023 पर्यंत**<br>सकाळी 11.00 ते संध्या. 05.00 पर्यंत अर्ज सादर करावा.<br>(प्रत्येक शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) |

**पदाचे नाव – परिचारीका (Staff Nurse) गट - क**

**एकूण रिक्त जागा – 652**

सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर - एम -21

वेतनश्रेणी - रु.35400-112400/- अधिक अनुज्ञेय भत्ते.

**एकूण रिक्त पदांपैकी 90% रिक्त पदे फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून भरण्यासाठी कप्पीकृत आरक्षण खालीलप्रमाणे**

<table>
<tr><th rowspan="2">रुग्णालयाचे नाव</th><th rowspan="2">कप्पीकृत आरक्षण</th><th colspan="10">प्रवर्ग</th><th rowspan="2">एकूण रिक्त पदे</th></tr>
<tr><th>अजा</th><th>अज</th><th>विजा (अ)</th><th>भज (ब)</th><th>भज (क)</th><th>भज (ड)</th><th>विमाप्र</th><th>इमाव</th><th>आदुघ</th><th>खुला</th></tr>
<tr><td rowspan="8">प्रमुख रुग्णालये व विशेष रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उपनगरीय रुग्णालये व प्रसुतिगृहे</td><td>सर्वसाधारण</td><td>25</td><td>10</td><td>09</td><td>03</td><td>05</td><td>03</td><td>03</td><td>61</td><td>42</td><td>223</td><td>384</td></tr>
<tr><td>खेळाडू 5%</td><td>01</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>05</td><td>02</td><td>17</td><td>25</td></tr>
<tr><td>प्रकल्पग्रस्त 5%</td><td>01</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>05</td><td>02</td><td>17</td><td>25</td></tr>
<tr><td>भूकंपग्रस्त 2%</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>01</td><td>-</td><td>07</td><td>08</td></tr>
<tr><td>माजी सैनिक 15%</td><td>04</td><td>02</td><td>01</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>14</td><td>09</td><td>54</td><td>84</td></tr>
<tr><td>पदवीधर / पदविकाधारक अंशकालिन 10%</td><td>03</td><td>02</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>08</td><td>06</td><td>36</td><td>55</td></tr>
<tr><td>अनाथ 1%</td><td colspan="10">06 पदे आरक्षित होतात</td><td>06</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>34</td><td>14</td><td>10</td><td>03</td><td>05</td><td>03</td><td>03</td><td>94</td><td>61</td><td>360</td><td>587</td></tr>
<tr><td></td><td>दिव्यांग - 4%</td><td colspan="11">महाराष्ट्र शासन निर्णय क्र.दिव्यांग-2021/प्र.क्र.33/नवि-28 दि.16.04.2021 अन्वये 'परिचारीका ' संवर्गाकरीता दिव्यांग पदनिश्चिती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने 'परिचारीका ' संवर्गाकरीता एकूण 23 पदे आरक्षित आहेत. सदर पदे प्रत्येकी<br>a) LV- Low Vision (क्षीण दृष्टी) मधुन 09 पदे,<br>b) OL- One Leg ( 1 पाय), CP- Cerebral Palsy (मेंदूचा पक्षाघात),<br>LC- Leprosy Cured (कुष्ठरोग मुक्त), Dw- Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे),<br>AAV- Acid Attack Victim (आम्ल हल्लाग्रस्त) मधुन 07 पदे,<br>c) SLD- Specific Learning Disability (विशिष्ट शिक्षण अक्षमता)<br>MI-Mental Illness (मानसिक आजार) मधुन 04 पदे,<br>d) MD- Multiple Disabilities Involving (a) to (c) मधुन 03 पदे भरण्यात येतील.</td></tr>
</table>

**एकूण रिक्त पदांपैकी 10% रिक्त पदे बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून भरण्यासाठी कप्पीकृत आरक्षण खालीलप्रमाणे**

| रुग्णालयाचे नाव | कप्पीकृत आरक्षण | प्रवर्ग | | | | | | | | | | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | |
| प्रमुख रुग्णालये व विशेष रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उपनगरीय रुग्णालये व प्रसुतिगृहे | सर्वसाधारण | 04 | 02 | 01 | - | - | - | - | 09 | 05 | 29 | 50 |
| | खेळाडू 5% | - | - | - | - | - | - | - | - | - | 01 | 01 |
| | प्रकल्पग्रस्त 5% | - | - | - | - | - | - | - | - | - | 01 | 01 |
| | भूकंपग्रस्त 2% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | माजी सैनिक 15% | - | - | - | - | - | - | - | 01 | 01 | 05 | 07 |
| | पदवीधर / पदविकाधारक अंशकालिन 10% | - | - | - | - | - | - | - | 01 | 01 | 04 | 06 |
| | **अनाथ** 1% | पद आरक्षित होत नाही | | | | | | | | | | - |
| | **एकूण** | 04 | 02 | 01 | - | - | - | - | 11 | 07 | 40 | 65 |
| | दिव्यांग - 4% | महाराष्ट्र शासन निर्णय क्र.दिव्यांग-2021/प्र.क्र.33/नवि-28 दि.16.04.2021 अन्वये 'परिचारीका ' संवर्गाकरीता दिव्यांग पदनिश्चिती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने 'परिचारीका ' संवर्गाकरीता एकूण 03 पदे आरक्षित आहेत. सदर पदे प्रत्येकी<br>a) LV- Low Vision (क्षीण दृष्टी) मधुन 01 पद,<br>b) OL- One Leg ( 1 पाय), CP- Cerebral Palsy (मेंदूचा पक्षाघात), LC- Leprosy Cured (कुष्ठरोग मुक्त), Dw- Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे), AAV- Acid Attack Victim (आम्ल हल्लाग्रस्त) मधुन 01 पद,<br>c) SLD- Specific Learning Disability (विशिष्ट शिक्षण अक्षमता) MI-Mental Illness (मानसिक आजार) मधुन 01 पद भरण्यात येईल. | | | | | | | | | | |

**महाराष्ट्र शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३३/नवि-२८ दि.१६.०४.२०२१ अन्वये 'परिचारीका' संवर्गाची दिव्यांग पदनिश्चिती करण्यात आली आहे. सदर दिव्यांग पदनिश्चितीनुसार 'परिचारीका' या पदाची शारिरीक पात्रता खालील प्रमाणे आहे.**

| संवर्गाचे नाव | शारिरीक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग | सदर पदाची जबाबदारी व कर्तव्ये | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| परिचारीका (Staff Nurse) | S- Sitting (बसणे)<br>ST- Standing (उभे राहणे)<br>W- Walking (चालणे)<br>MF- Manipulation with Fingers (बोटांची हालचाल करणे)<br>R- Reading (वाचणे)<br>W-Writing (लिहिणो)<br>SE-Seeing (पाहणे)<br>H- Hearing (ऐकणे)<br>C-communication (संवाद साधणे) | a) LV- Low Vision (क्षीण दृष्टी)<br>b) OL- One Leg (1 पाय)<br>CP- Cerebral Palsy (मेंदूचा पक्षाघात)<br>LC- Leprosy Cured (कुष्ठरोग मुक्त)<br>Dw- Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे)<br>AAV- Acid Attack Victim (आम्ल हल्लाग्रस्त)<br>c) SLD- Specific Learning Disability (विशिष्ट शिक्षण अक्षमता)<br>MI-Mental Illness (मानसिक आजार)<br>d) MD- Multiple Disabilities Involving (a) to (c) (गट अ ते गट क मध्ये दर्शविण्यात आलेल्या दिव्यांगत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व) | रूग्णांना प्रवेश व विमुक्त. रूग्णाला व नातेवाईकाला सहाय्य व समज. रूग्णांना स्वच्छ करणे, त्यांची देखरेख, तोंड, केस, नखे, दाबबिंदू यांची काळजी घेणे. चार-चार तासांनी रूग्णांच्या दाबबिंदूची काळजी घेणे. गरम पाण्याच्या बाटल्या देणे व काढणे. रूग्णांना मलमूत्र बॅग देणे व काढणे. बिछाने बनविणे. जेवण भरविणे. दूध व जेवण यांचे वाटप करणे. विशेष अन्न पुरविणे. रूग्णांना परिचर्या देखरेख शिकवणे. औषधांची माहिती देणे. इंजेक्शनची माहिती देणे. इजेक्शन देण्यास मदत देणे. इंजेक्शनसाठी तयारी व निपटारा. रूग्णांना देण्यात येणा-या औषधे व इंजेक्शन यांचा अभिलेख ठेवणे. रूग्णांच्या शरीराचे तापमान घेऊन त्याचा अभिलेख ठेवणे. डॉक्टरांबरोबर पर्यवेक्षण घेणे. तांत्रिक कामे उदा. एनिमा, लघवीची नळी, पट्टी बदलणे, ऑक्सिजन उपचार यांची नियमानुसार तयारी व निपटारा. मुत्र चिकित्सा, रक्ताचा, मुत्राचा नमुना गोळा करणे व त्यांच्यावर नाव लिहिणे व सक्षम वाट लावणे. रूग्णांना आपल्या विभागातून दुस-या विभागात जाण्यास सोबत करणे. विभागातील अधिपरिचारीका नोंदवह्या, परिरक्षण साधनसामुग्री बाबतच्या परिरक्षणाबद्दल जबाबदार असतील. परिसेविकेच्या अनुपस्थितीत सदर कक्षात कर्तव्यावर असलेली अधिपरिचारीका कक्षाची जबाबदारी पाहील. | महाराष्ट्र शासन निर्णय क्र.दिव्यांग-2021 / प्र.क्र. 33 /नवि-28, दि.16/04/2021 सोबत संलग्नित करण्यात आलेल्या परिशिष्ट 'अ' मधील तक्त्यात अनु. क्र.65 वर दर्शविल्यानुसार, सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत शुश्रूषा सेवा विभाग व विशेष रूग्णालयातील "परिचारीका" या संवर्गाकरीता दिव्यांग पद सुनिश्चिती करण्यात येत असून सदर दिव्यांग पदसुनिश्चिती मान्य आहे. उमेदवार योग्य ती सॉफ्टवेअर साधने आणि उपकरणे यांच्या सहाय्यासह ग्राह्य धरण्यात येईल. |

➢ **<u>शैक्षणिक अर्हता</u>**

1) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता 12 वी (10+2) उत्तीर्ण झालेला असावा.

2) उमेदवार महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलने विहित केलेला जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी (General Nursing & Midwifery) अभ्यासक्रम पूर्ण उत्तीर्ण केलेला असावा.(3 किंवा 3½ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण उत्तीर्ण झालेला असावा.)

3) उमेदवार महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून नोंदणीकृत असावा व नोंदणीचे नूतनीकरण अद्ययावत केलेले असावे.

4) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर /निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

5) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्रे किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे किंवा वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडे सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी.ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

➢ **<u>वयोमर्यादा</u>**

1. अर्ज सादर करावयाच्या दिनांकास म्हणजेच दि. 21.03.2023 रोजी खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे पर्यंत व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत 18 ते 43 वर्षे पर्यंत.
2. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कायम सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.
3. माजी सैनिक व शारिरीकदृष्टया दिव्यांग असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे पर्यंत शिथिल करण्यात येईल.
4. शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता उपरोक्त पदांसाठी असलेली विहित वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.
5. पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना 55 वर्षापर्यंत वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल.

➢ <u>**निवडीचे निकष –**</u>

**अ) एकूण रिक्त पदांपैकी 90% पदे फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून भरण्यासाठी निवडीचे निकष खालीलप्रमाणे:-**

बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या, पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता, अटी व शर्ती धारण करीत असलेल्या उमेवारांमधून त्यांच्या परिचारीका अभ्यासक्रम जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी पदविका (G.N.M.) उत्तीर्ण वर्ष तसेच जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी पदविका (G.N.M.) अभ्यासक्रमाच्या (तीन किंवा साडेतीन वर्षाच्या) प्रत्येक वर्षाचे प्राप्त गुण लक्षात घेऊन अंतिम टक्केवारीचे परिगणन करून निवडयादी तयार करण्यात येईल. निवडीच्या निकषानुसार परिगणन करण्यात आलेली अंतिम टक्केवारी गुणवत्ता यादीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

**ब) एकूण रिक्त पदांपैकी 10% पदे बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून भरण्यासाठी निवडीचे निकष खालीलप्रमाणे:-**

बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता, अटी व शर्ती धारण करीत असलेला उमेदवार उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एच. एस. सी. /12 वी) मध्ये प्रथम प्रयत्नात किमान 65% गुण व जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी पदविकेमध्ये किमान 55% गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदर उमेदवारांची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एच. एस. सी. /12 वी) व जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी पदविका (G.N.M.) अभ्यासक्रमाच्या (तीन किंवा साडेतीन वर्षाच्या) प्रत्येक वर्षाच्या प्राप्त गुणांनुसार अंतिम टक्केवारीचे परिगणन करून निवडयादी तयार करण्यात येईल. या दोन्हीमध्ये प्राप्त केलेल्या अंतिम गुणांच्या टक्केवारीच्या सरासरी गुणवत्तेनुसार (by average merit) निवड यादी तयार करण्यात येईल. निवडीच्या निकषानुसार परिगणन करण्यात आलेली अंतिम टक्केवारीची सरासरी गुणवत्ता यादीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

**क)** 90% रिक्त पदांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेले अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इ.मा.व., वि.मा.प्र. या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर संवर्गाची पदे,10% पदे भरण्यासाठी देण्यात येणा-या जाहिरातीतून बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**ड)** 90% अंतर्गत (फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकरीता) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या आरक्षणांतर्गत उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर आरक्षणाची रिक्त पदे, 10% अंतर्गत (बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकरीता) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या आरक्षणांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जामधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**इ) एकूण रिक्त पदांपैकी 90% व 10% पदांसाठी खालीलप्रमाणे समान निवडीचे निकष आहेत.**

1. उमेदवाराने परिचारीका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष दुसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण केले असल्यास संबंधित वर्षात मिळविलेल्या एकूण गुणांमधून 10 गुण वजा करुन अंतिम टक्केवारीचे परिगणन करण्यात येईल.

2. तसेच, उमेदवाराने परिचारीका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष तिसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण केले असल्यास संबंधित वर्षात मिळविलेल्या एकूण गुणांमधून 20 गुण वजा करुन अंतिम टक्केवारीचे परिगणन करण्यात येईल.

3. परिचारीका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष तीन पेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

4. सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रांसह सादर केलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

5. समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल.

## **निवडीची कार्यपध्दती**

1. एका उमेदवारास एकच अर्ज करता येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरीता अर्ज करण्याची मुभा राहील.
2. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुला प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल.
3. खुला प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेली असेल अशा उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुला प्रवर्गातील पदावर नेमणूक करण्यात येईल.
4. परिचारीका या संवर्गाची अर्हता व सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांची, गुणवत्तेनुसार तसेच रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार व कप्पीकृत आरक्षणानुसार निवडयादी प्रसिध्द करण्यात येईल.
5. निवड यादीतील उमेदवार विहित मुदतीत निवडीच्या कार्यवाहीकरीता हजर न झाल्यास गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.
6. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सामाईक गुणवत्ता यादी (Common Merit list) कार्यकारी आरोग्य अधिकारी कार्यालय, 3 रा मजला, एफ/दक्षिण विभाग, परेल, मुंबई- 400 012 येथे सूचना फलकावर तसेच https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
7. निवड यादी एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनाकांपर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवड यादी व्यपगत होईल.
8. उमेदवाराने नियुक्ती आदेश स्विकारल्याच्या दिनांकापासून 07 दिवसांच्या कालावधीमध्ये कामाच्या ठिकाणी हजर न झाल्यास उमेदवाराची नियुक्ती रद्द समजण्यात येईल. सदर उमेदवाराच्या ठिकाणी गुणवत्ता यादीतील त्या-त्या प्रवर्गातील पुढील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

## **उमेदवारांकरीता सूचना**

1. उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून दि.08/03/2023 ते दि.21/03/2023 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.
2. भरती प्रक्रियेतील सर्व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.
3. ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/ जिल्हा सैनिक बोर्ड/ अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविले आहे, अशा उमेदवारांना देखील स्वतंत्ररित्या अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन पदवीधर इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
4. उमेदवाराने अर्ज संपूर्णत: अचूक भरावा. पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह अचूक असावा. अर्जातील संपूर्ण माहिती पुन्हा तपासून पहावी. उमेदवारांनी त्यांच्या अर्जाची छायांकित प्रत पुढील कार्यवाहीसाठी स्वत:कडे जपून ठेवावी.
5. अर्जामध्ये उमेदवाराने पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास त्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार/निवेदन करता येणार नाही. अर्ज सादर केल्यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवारांना बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिल करण्याबाबतच्या अटी तपासूनच उमेदवारांनी अर्ज भरावा.

6. <u>अर्ज सादर करण्याची पध्दत-</u>

(a) पात्रता निकषांची पूर्तता करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकीत साक्षांकीत प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी टपालाद्वारे किंवा वैयक्तिकरित्या पाठविणे आवश्यक आहे.

(b) उमेदवाराने विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेला अर्ज A-4 आकाराचे कागदपत्रे सुस्थितीत राहतील अशा आकाराच्या बंद लिफाफ्यामध्ये उपरोक्त नमूद केलेल्या पत्त्यावर विहित दिनांकापर्यंत सादर करावेत.

(c) ९०% अंतर्गत (बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेले उमेदवार) अर्ज करणा-यांनी लिफाफ्यावर खालीलप्रमाणे माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

**९०% अंतर्गत परिचारीका पदासाठी अर्ज**

०१) G.N.M.उत्तीर्ण महाविद्यालयाचे नाव- ………………….

०२) G.N.M.उत्तीर्ण वर्ष-………………………………………

०३) अर्ज करण्याचा जातप्रवर्ग/समांतर आरक्षण-……………

प्रति,

वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय, कस्तुरबा रुग्णालय (संसर्गजन्य रोगांसाठी),वॉर्ड नं.07,

(प्रशिक्षण/लेक्चर हॉल), मध्यवर्ती कारागृहासमोर, साने गुरुजी मार्ग, (ऑर्थर रोड),

चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-400 011.

**प्रेषक-**

(d) १०% अंतर्गत (बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेले उमेदवार) अर्ज करणा-यांनी लिफाफ्यावर खालीलप्रमाणे माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

**१०% अंतर्गत परिचारीका पदासाठी अर्ज**

| इ.१२ वी (HSC) टक्केवारी (%) | G.N.M.उत्तीर्ण टक्केवारी (%) | | |
|---|---|---|---|
| | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष |
| | | | |
| अर्ज करण्याचा जातप्रवर्ग/ समांतर आरक्षण- | | | |

प्रति,

वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय, कस्तुरबा रुग्णालय (संसर्गजन्य रोगांसाठी),वॉर्ड नं.07,

(प्रशिक्षण/लेक्चर हॉल), मध्यवर्ती कारागृहासमोर, साने गुरुजी मार्ग, (ऑर्थर रोड),

चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-400 011.

**प्रेषक-**

7. उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती सत्य आहे असे गृहीत धरुन कागदपत्रांची छाननी करुन, परिचारीका अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवारांची निवडीच्या निकषांनुसार अंतिम टक्केवारीचे परिगणन करुन उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची तात्पुरती यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

8. सदर यादीमध्ये उमेदवारांची नावे, मूळ कागदपत्रे पडताळणीसाठीचा दिनांक, वेळ, ठिकाण व इतर तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराने सर्व मूळ प्रमाणपत्रांसह पडताळणीकरीता उपस्थित रहावे.

9. उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

10. तात्पुरत्या यादीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास किंवा निवडीच्या विहित अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर आढळल्यास त्यास निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

11. पात्र उमेदवारांची अंतिम निवडयादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच **कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते,(शुश्रूषा सेवा विभाग) एफ/दक्षिण विभाग कार्यालय इमारत, खोली क्रमांक ४९, ०३ रा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई – ४०० ०१२** यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

12. **सदर भरतीप्रक्रिये संदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वरील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ/ वेबसाइट उमेदवारांनी वेळोवेळी अवलोकन करणे आवश्यक आहे.**

- **<u>सर्वसाधारण अटी</u>**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.
2. जाहिरातीमध्ये दिलेल्या रिक्त पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीबाबत आवश्यक सर्व प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

4. **अर्ज विहित नमुन्यात सर्व दृष्टीने परिपूर्ण असावा. केवळ विहित कालावधीमध्ये सादर केलेले अर्जच भरतीकरीता ग्राह्य धरण्यात येतील. विहित नमुन्यात नसलेले, विहित दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज, अपूर्ण अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. उमेदवाराचा वापरात असलेला/चालु स्थितीत असलेला ई-मेल आयडी तसेच दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक अचूक भरण्यात यावा आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.**

5. **टपालाव्दारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

6. **टपालाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.**

7. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे रंगीत छायाचित्र अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवून त्यावर स्वाक्षरी करण्यात यावी. त्याच छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराने जवळ असणे आवश्यक आहे.

8. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

9. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला वर नमूद केलेल्या पदाच्या भरतीसाठी अर्ज करावयाचा असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खाते प्रमुखाचे `ना-हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.

10. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.

11. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सोबत जोडणे आवश्यक आहे.

12. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.

13. उमेदवाराने खाली नमुद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

**14. अर्ज व अर्जासोबत जोडण्यात येणा-या छायांकीत प्रतीसाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे A-4 आकारातील असावे.  तसेच छायांकीत प्रती सुस्पष्ट वाचता येण्याजोग्या(Readable) असाव्यात.**

अ) उमेदवारांनी अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र, 50/100 गुणांची मराठी परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र, G.N.M Diploma Certificate, G.N.M Passing Certificate, G.N.M Registration Certificate, G.N.M अभ्यासक्रम कितव्या प्रयत्नात उत्तीर्ण झाले आहेत याबाबतचे Attempt Certificate, प्रत्येक वर्षाची G.N.M.अभ्यासक्रमाची गुणपत्रिका, MS-CIT प्रमाणपत्र, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधतेचे प्रमाणपत्र, अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा तसेच, समांतर आरक्षणाचा लाभ घेण्याच्या दृष्टीकोनातून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे (वित्तीय वर्ष 2021-22) प्रमाणपत्र यांच्या मूळ व छायांकित साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

ब) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नावात बदल झाल्याबाबतचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र सादर करावे.  तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

क) फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड आवश्यक आहे.

**15.** अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**16.** मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांने सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे.  नियुक्तीच्यावेळी जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र.1064/2011/16बी दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेला संबंधित उमदेवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करू शकेल.  मागासवर्गीयासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.  तथापि, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवाराने संबंधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे आवश्यक आहे.  मागासवर्गीय

कर्मचा-याने जात पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करून संबंधित पडताळणी समितीकडून त्याची पोचपावती सादर न केल्यास, तसेच त्यांनी सादर केलेले 'जात प्रमाणपत' संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविण्यात आल्यास त्याक्षणी त्यांना कोणतीही सूचना न देता/त्यांच्याविरूध्द कोणतीही खात्यांतर्गत चौकशीची कारवाई न करता त्यांचे नियुक्तीचे आदेश त्वरित रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

17. खुला उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रताविषयक अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील पद आरक्षित/उपलब्ध नसले तरीही अर्जामध्ये मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

18. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधे/4019/प्र.क्र.31/16-अ, दि.12.12.2019 व दिनांक 31.05.2021 अन्वये सक्षम अधिका-यांनी विहित नमुन्यात दिलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

19. उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो / ती भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

20. विजा (अ), भज (ब), भज (क) व भज (ड) या प्रवर्गातील विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

21. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र (Non-Creamylayer Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

22. शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.(17/2000)/बारा दि.01.07.2005 अन्वये लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुद्धा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये अर्जदाराने 'लागू नाही' असा शेरा नमूद करावा.)

23. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

**24.** दिव्यांग उमेदवाराने किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्राची छायांकीत प्रत साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**25.** शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या दिव्यांग उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर दिव्यांग उमेदवार 'परिचारीका ' या पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्ट्या पात्र ठरविल्यानंतर त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

**26.** समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निर्देशानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**27.** खेळाडूंचे आरक्षण महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक राक्रिधो-2002/प्र.क्र.अ.68/क्रियुसे-2 दि. 01.07.2016 च्या तरतूदीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रिधो-2002/प्र.क्र.अ.68/क्रियुसे-2 दि. 18.08.2016 आणि त्यानंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

| गट- क साठी पात्र क्रीडा स्पर्धा |
|---|
| गट-अ व गट- ब या पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू <u>अथवा</u> |
| ०१) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ट गट.<br>I) राष्ट्रीय ज्यूनिअर गट अजिंक्यपद स्पर्धा . |
| ०२) राज्यस्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा.<br>I) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा . |
| ०३) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा. |
| ०४) राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा. |
| ०५) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा. (अश्वमेध) |
| ०६) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा. |
| ०७) राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा. |
| ०८) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा. |
| (टिप- अ.क्र. ०१ ते ०५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ०५% आरक्षणासाठी असतील.) |

28. प्रकल्पग्रस्तांसाठी सन 2001 महाराष्ट्र अधिनियम क्र.11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

29. भुकंपग्रस्तासाठी आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग क्र. भूकंप 1009/ प्र.क्र.207/ 2009/16-अ, दि.27.08.2009 व शासन निर्णय क्र. विकाक 2215/प्र.क्र.337/16-अ, दि.04.11.2016 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वतंत्रपणे भरण्यात येतील.

30. माजी सैनिकांसाठी 15% प्रमाणे आरक्षित पदे शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. स्वातंत्र्य सैनिकांचे अथवा त्यांच्या विधवा वारस पत्नीचे निधन झाल्यास त्यांनी केलेले नामनिर्देशित मृत्यु पश्चात अस्तित्वात राहणार नाही. उमेदवारास माजी सैनिक विमुक्त प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

31. अनाथ मुलांसाठी १% पदे प्रमाणे आरक्षित पदे परिपत्रक क्र. एमबीसी/6944 दि.27.09.2022 सोबतच्या शासन निर्णय क्र.अनाथ-2018/प्र.क्र.182/का-03 दि.06.09.2022 मध्ये विहित केलेल्या निर्देशानुसार भरण्यात येतील.

32. पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांची आरक्षित पदे शासन निर्णय क्र.अंशका 1918/प्र.क्र.507/16-अ दि.02.01.2019 व 1913/प्र.क्र.57/2013/16-अ दि.19.09.2013 मध्ये विहित केलेल्या निर्देशानुसार भरण्यात येतील.

33. सुशिक्षित बेरोजगार आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन कर्मचारी म्हणून तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केलेल्या बाबतच्या प्रमाणपत्राची मुळ प्रत व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत सेवायोजन कार्यालयाच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

34. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

35. निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

36. निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय परिक्षक यांच्याकडून 'परिचारीका' या पदासाठी पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच त्यांची बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत नियुक्ती करण्यात येईल.

37. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) जामिनपत्र सादर करावे लागेल. उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुध्दा बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

38. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

39. निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही रुग्णालयात /प्रसुतिगृहात नियुक्ती करण्यात येईल. उमेदवारास तीनही पाळ्यांमध्ये (Shift) काम करावे लागेल.

40. उमेदवार नियुक्तीनंतर त्या आस्थापनेवर कमीत कमी ०३ वर्षाच्या कालावधीसाठी असेल. नियुक्तीपूर्वी अथवा नियुक्तीनंतर आस्थापना बदलण्याकरीता महानगरपालिका अधिकारी अथवा राजकीय अधिका-यांकडून वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त इतर कारणास्तव आस्थापना बदलीसाठी दबाव आणल्यास उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

41. नियुक्तीनंतर उमेदवारांना सेवानिवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची नाही.

42. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होतील.

43. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नविन 'परिभाषित अंशदान निवृत्ती योजना' लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

44. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

➢ **<u>विशेष सूचना</u>**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविले जाईल.

3. मध्यस्थ/ठक/बृहन्मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

4. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

5. वर नमूद केलेल्या रिक्त पदांच्या अहवालानुसार उमेदवार उपलब्ध होताच भरतीची प्रक्रिया त्वरित बंद करण्याचे अधिकार प्रशासनाला राहतील.

6. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रीया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

सही/-

**(डॉ. मंगला गोमारे)**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

**परिचारीका (Staff Nurse) पदासाठी विनंती अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालीलक्रमाने जोडाव्यात व कागदपत्रांना पृष्ठक्रमांक देण्यात यावा.**
**अर्ज व अर्जासोबत जोडण्यात येणा-या छायांकीत प्रतीसाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे A-4 आकारातील असावे. तसेच छायांकीत प्रती सुस्पष्ट वाचता येण्याजोग्या (Readable) असाव्यात.**

| अ.क्र. | कागदपत्रांचा क्रम |
|---|---|
| ०१ | जन्म दाखला |
| ०२ | शाळा सोडल्याचा दाखला |
| ०३ | दहावी (SSC) गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| ०४ | बारावी(HSC) गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| ०५ | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)प्रथम वर्ष गुणपत्रिका |
| ०६ | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)व्दितीय वर्ष गुणपत्रिका |
| ०७ | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)तृतिय वर्ष गुणपत्रिका |
| ०८ | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)पदविका (Diploma) प्रमाणपत्र |
| ०९ | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)पास झाल्याचे प्रमाणपत्र (Passing Certificate ) |
| १० | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)Attempt Certificate. |
| ११ | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरणाची पावती (नोंदणी प्रमाणपत्राची वैधता संपुष्टात आली असल्यास) |
| १२ | संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र |
| १३ | जात प्रमाणपत्र |
| १४ | जात वैधता प्रमाणपत्र |
| १५ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र नुतनीकरणाची पावती (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची वैधता संपली असल्यास) |
| १६ | समांतर आरक्षणाबाबतची प्रमाणपत्रे (दिव्यांग व्यक्ती / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / माजी सैनिक / अंशकालीन पदवीधर उमेदवार/अनाथ) |
| १७ | विवाहनंतरच्या नावाने महिला उमेदवार अर्ज करीत असलयास विवाह नोंदणी प्रमाणपत्र व महाराष्ट्र शासन राजपत्राची प्रत |
| १८ | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| १९ | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम,२००५ नुसार नमुना सोबत जोडलेला आहे. |
| २० | सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्र |
| २१ | शिक्षा / गुन्हा / न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याबाबत कागदपत्रे |
| २२ | सध्या नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे नाहरकत प्रमाणपत्र |
| २३ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कायम सेवेत असल्यास ओळखपत्राची प्रत |

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**

**"परिचारीका" (Staff Nurse) पदासाठी अर्ज**

उमेदवाराने खालील दोन्हीपैकी एका समोर √·असे चिन्ह करावे

| | | |
|---|---|---|
| 01 | बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून ''परिचारीका'' अभ्यासक्रम (G.N.M.) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकरीता अर्ज (९० % अंतर्गत रिक्त असलेल्या जागांकरीता अर्ज ) | |
| 02 | बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून''परिचारीका'' अभ्यासक्रम (G.N.M.) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकरीता अर्ज<br>(१० % अंतर्गत रिक्त असलेल्या जागांकरीता अर्ज ) | |

प्रति,
कार्यकारी आरोग्य अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य खाते,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय इमारत,
खोली क्रमांक ४९, ०३ रा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
परळ, मुंबई – ४०० ०१२.

**उमेदवाराने त्याचे पारपत्र आकारातील अलीकडील रंगीत छायाचित्र येथे चिकटवून छायाचित्रावर स्वाक्षरी करावी.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत प्रमुख रुग्णालये, विशेष रुग्णालये, उपनगरीय रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रसूतिगृहे यांच्या आस्थापनेवरील " **परिचारीका** (Staff Nurse) " या पदाकरीता दि.२७.०२.२०२३ च्या जाहिरातीनुसार मी निम्नस्वाक्षरीकार विनंती अर्ज सादर करीत आहे.

| अ. क्र. | उप क्र. | तपशील | |
|---|---|---|---|
| १ | अ) | उमेदवाराचे संपूर्ण नाव (मराठीत) | |
| | | आडनाव | |
| | | नाव | |
| | | वडिलांचे/पतीचे नाव | |
| | | आईचे नाव | |
| | ब) | वैवाहिक स्थिती | विवाहित [ ] अविवाहित [ ] |
| | क) | विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरीता)-<br>(सोबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र व महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राची छायांकीत प्रत जोडण्यात यावी.) | |
| २ | अ) | आधार क्रमांक किंवा आधार नोंदणी क्रमांक | [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] |
| | ब) | पॅन क्रमांक | [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] |
| ३ | | लिंग | पुरुष [ ] स्त्री [ ] |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | अ) | जन्म दिनांक (dd/mm/yyyyy या नमुन्यामध्ये दिनांक नमूद करावी.) | |
| | ब) | दिनांक-२१/०३/२०२३ रोजी असलेले वय | वर्ष-   महिने-   दिवस- |
| ५ | अ) | उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कायम कर्मचारी आहेत का ? | होय   नाही |
| | ब) | असल्यास कर्मचारी संकेतांक क्रमांक | |
| ६ | अ) | सध्याच्या वास्तव्याचा संपूर्ण पत्ता | |
| | | घर क्रमांक / घर / बिल्डींगचे नाव | |
| | | विभाग / लॅडमार्क /मार्ग | |
| | | शहराचे / गावाचे नाव | |
| | | तालुका व जिल्हा | |
| | | पिन कोड क्रमांक | |
| | ब) | कायम वास्तव्याचा पत्ता | |
| | | घर क्रमांक / घर / बिल्डींगचे नाव | |
| | | विभाग / लॅडमार्क /मार्ग | |
| | | शहराचे / गावाचे नाव | |
| | | तालुका व जिल्हा | |
| | | पिन कोड क्रमांक | |
| | क) | स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) | |
| | ड) | उमेदवाराचा नित्य वापरात असलेला ई/मेल आयडी क्रमांक | |
| | इ) | उमेदवाराचा नित्य वापरात असलेला मोबाईल क्रमांक- | |

| ७ | | **अर्जदाराचा शैक्षणिक तपशील** |
|---|---|---|

अ)

| अ क्र | अभ्यासक्रम | सर्व विषयातील प्राप्त गुण | पैकी गुण | टक्के | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मराठी विषयातील गुण | | मंडळाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्राप्त गुण | पैकी गुण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) | | | | | | | |
| २ | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (HSC) | | | | | | | |

ब)

| अ क्र | अभ्यासक्रम | एकूण प्राप्त गुण | पैकी गुण | टक्के | कितव्या प्रयत्नात उत्तीर्ण (I/II/III) | उत्तीर्ण झाल्याचे महिना व वर्ष | संस्था/विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| i | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)प्रथम वर्ष | | | | | | |
| ii | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)द्वितीय वर्ष | | | | | | |
| iii | जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा अभ्यासक्रम (G.N.M)तृतीय वर्ष | | | | | | |
| | एकूण गुण (i+ii+iii) | | | | | | |

★जनरल नर्सिंग ॲन्ड मिडवायफरी डिप्लोमा (G.N.M)अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाले असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे.

क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचा नोंदणी क्रमांक व वैधता दिनांक (रजिस्ट्रेशनची वैधता दिनांक संपुष्टात आली असल्यास नुतनीकरणाची पोचपावती सोबत जोडावी.)

| | |
|---|---|
| नोंदणी क्रमांक | |
| वैधता दिनांक | |

<table>
<tr><td></td><td>ड)</td><td>संगणक विषयक एम.एस.सी.आय.टी. किंवा शासनाने विहित केलेले संगणक विषयक अभ्यासक्रम उत्तीर्ण झाला आहात का ?</td><td>
<table><tr><td>होय</td><td></td><td>नाही</td><td></td></tr></table>
(असल्यास त्याबाबतचा तपशील)
<table><tr><td>संगणक विषयक अभ्यासक्रमाचे नाव</td><td>उत्तीर्ण झाल्याचे वर्ष</td></tr><tr><td></td><td></td></tr></table>
</td></tr>
<tr><td>८</td><td></td><td colspan="2">सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील</td></tr>
<tr><td></td><td>अ)</td><td>उमेदवाराची स्वत:ची जात/पोटजात/ प्रवर्ग</td><td>जात- पोटजात- प्रवर्ग-</td></tr>
<tr><td></td><td>ब)<br>क)</td><td>उमेदवार सामाजिक आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छितो/इच्छिते का ?<br>उमेदवार ज्या प्रवर्गातुन अर्ज करु इच्छितो/इच्छिते योग्य तेथे √·असे चिन्ह करा.<br>(सामाजिक आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित असल्यास, जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या अद्ययावत प्रमाणपत्राची / नुतनीकरण पावतीची प्रत सोबत जोडावी.)</td><td>
<table><tr><td>होय</td><td></td><td>नाही</td><td></td></tr></table>
<table>
<tr><td>अनुसूचित जाती</td><td>अनुसूचित जमाती</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>भटक्या जमाती (क)</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>भटक्या जमाती (ड)</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>आर्थिक दृष्टया दुर्बल घटक</td><td>सर्वसाधारण/ खुला</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td></td><td>ड)</td><td>उमेदवार समांतर आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छितो/इच्छिते का ?<br>असल्यास योग्य तेथे √ असे चिन्ह करा.<br><br>(समांतर आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित असल्यास त्याबाबत जाहिरातीत नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावी.)</td><td>
<table><tr><td>होय</td><td></td><td>नाही</td><td></td></tr></table>
<table>
<tr><td>माजी सैनिक</td><td>अंशकालीन कर्मचारी</td><td>भूकंपग्रस्त</td><td>प्रकल्पग्रस्त</td><td>खेळाडू</td><td>अनाथ</td><td>दिव्यांग व्यक्ती</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
दिव्यांग व्यक्ती असल्यास दिव्यांगत्वाचा पुढीलपैकी किमान एक उपप्रकार नमूद करणे आवश्यक आहे.
<table>
<tr><td>a)</td><td>LV- Low Vision / क्षीणदृष्टी</td><td></td></tr>
<tr><td>b)</td><td>OL-One Leg /1 पाय</td><td></td></tr>
<tr><td></td><td>CP-Cerebral Palsy/मेंदुचा पक्षाघात</td><td></td></tr>
<tr><td></td><td>LC-Leprosy Cured /कुष्ठरोगमुक्त</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Dw-Dwarfism /शारिरीक वाढ खुंटणे</td><td></td></tr>
<tr><td></td><td>AAV-Acid Attack Victim (आम्ल हल्लाग्रस्त)</td><td></td></tr>
<tr><td>c)</td><td>SLD- Specific Learning Disablity/ विशिष्ट शिक्षण अक्षमता</td><td></td></tr>
<tr><td></td><td>MI – Mental Illness/मानसिक आजार</td><td></td></tr>
<tr><td>d)</td><td>MD-Multiple Disabilities involving (a) to (c) /गट अ ते गट क मध्ये दर्शविण्यात आलेल्या दिव्यांगत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व</td><td></td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | | सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक | क्रमांक -<br>दिनांक - |
| १० | अ) | उमेदवारास यापूर्वी कोणत्याही गुन्ह्याकरीता शिक्षा झाली होती का ? (असल्यास त्याचा तपशील नमूद करुन कागदपत्रे सोबत जोडावी.) | होय [ ] नाही [ ] |
| | ब) | उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे का ? (असल्यास त्याबाबतचा तपशील नमूद करुन कागदपत्रे सोबत जोडावी.) | होय [ ] नाही [ ] |
| | क) | सध्या उमेदवार इतरत्र नोकरीस आहे का ? (असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन पूर्वीच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र सोबत जोडावे.) | होय [ ] नाही [ ] |

मी, येथे असे प्रमाणित करतो/ करते की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती बरोबर व खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

**आपला/आपली विश्वासू,**

**दिनांक-** **उमेदवाराची स्वाक्षरी**

**ठिकाण-** **उमेदवाराचे संपूर्ण नाव**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, 2005 नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना
प्रतिज्ञापत्र
नमुना-अ
(नियम 4 पहा)

मी श्री./श्रीम./कुमारी.................................................................................................

श्री...........................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय............वर्ष, राहणार, ...........................................................................................

..................................................................................................................

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1. मी "**परिचारीका (Staff Nurse)**" या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. आज रोजी मला ........................ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.28 मार्च, 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .................... इतकी आहे.
3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण -

दिनांक -

आपला/आपली विश्वासू,

उमेदवाराची स्वाक्षरी
उमेदवाराचे संपूर्ण नाव

**परिचारीका** (Staff Nurse) या पदाकरीता दि. 08/03/2023 ते दि.21/03/2023 या कालावधीमध्ये **"<u>वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय, कस्तुरबा रुग्णालय (संसर्गजन्य रोगांसाठी), वॉर्ड नं.07, (प्रशिक्षण/लेक्चर हॉल), मध्यवर्ती कारागृहासमोर, साने गुरुजी मार्ग, (ऑर्थर रोड), चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-400 011.</u>"** या पत्त्यावर विहित मुदतीत टपालाने किंवा प्रत्यक्ष सादर करण्यात आलेले अर्जच भरतीप्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येतील. अन्य ठिकाणी सादर करण्यात आलेले अर्ज भरतीप्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.